# मुंबई विद्यापीठ

दिनांक: २२ जानेवारी २०१३

<u>सुचना फलकावर माहितीसाठी</u>

विद्यापीठातील विविध विभाग, संस्था व सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, सकाळ वृत्तपत्राच्या वतीने येत्या 25 जानेवारी रोजी शिक्षणविषयक खास पुरवणी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. मा. कुलगुरू श्री. डॉ. राजन वेळूकर या पुरवणीचे अतिथी संपादक आहेत. शिवाय मा. उच्च व तंत्र शिक्षणमंत्री श्री. राजेश टोपे, मा. उच्च – तंत्र व वैद्यकीय शिक्षणमंत्री श्री. डी. पी. सावंत, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे (नवी दिली) अध्यक्ष मा. श्री. डॉ. एस. एस. मंथा, तंत्रशिक्षण संचालनालयाचे संचालक मा. श्री. डॉ. एस. के. महाजन, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे संचालक मा. श्री. डॉ. प्रकाश खोडके यांच्यासह शिक्षण क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी या पुरवणीमध्ये लेख लिहिले आहेत. शिक्षण क्षेत्रातील अशा उच्चपदस्थ मान्यवरांचे मार्गदर्शनपर लेख वाचण्याची संधी सर्व संचालक / प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थ्यांना मिळणार आहे. ही पुरवणी मुंबई, ठाणे व रायगड जिल्ह्यामध्ये प्रसिद्ध होणार आहे.

त्यामुळे विद्यापीठातील सर्व विभागप्रमुख व संलग्न महाविद्यालयांचे प्राचार्य / संचालक यांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी या पुरवणीविषयी शिक्षक व विद्यार्थ्यांना माहिती द्यावी. सुचना फलकावर तसेच फळ्यावर पुरवणीबाबत जाहीर माहिती प्रसिद्ध करावी, जेणेकरून सर्वांना पुरवणी वाचण्याची संधी मिळेल.

आपला विश्वासू,

सही/-

संचालक

बि.सी.यु.डी.

lalapk